**<u>आरोपीचा बचावाचा साक्षीदार क्र.२ चा शपथेवर जबाब –</u>**

माझे नाव – कोमल दावीद सुर्यवंशी

माझे वय – ३४ वर्षे

व्यवसाय – मजुरी

राहाणार – हंगा, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास विधीज्ञ श्री. आर.यु. बनकर यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>** –

१. मी आरोपीला ओळखते. आरोपी माझे शेजारी राहातात. कर्ज आरोपीची पत्नी अरूणा शिवाजी पवार हिने घेतले आहे. अरूण माझे बचत गटाच्या सदस्या आहेत. माझे बचत गटामध्ये १० सदस्य आहेत. माझे बचत गटाचे नाव संदेश असे आहे. फिर्यादी पतसंस्थेकडुन एक महिला मनिषा ही आली होती. त्यांनी आम्हाला बचत गट तयार करण्यास सांगितले व तसेच त्याकरिता कर्ज देवु असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही बचत गट तयार केला. सन २०१८ साली सर्व दहा सदस्यांनी कर्ज घेतले होते. त्यावेळेस पतसंस्थेकडुन प्रत्येक महिलेकडुन कोरे धनादेश घेण्यात आले. ज्या महिलेकडे धनादेश नव्हते त्यांचे पती किंवा मुलाकडुन धनादेश घेण्यात आले. सदरील धनादेशावर फक्त सहया होत्या. त्यांनी आमचे आधारकार्डची व रेशन कार्डची झेरॉक्स घेतली होती. त्यावेळेस त्यांनी आमचे फॉर्म भरले व त्यांनी ते त्यांच्याकडेच ठेवले. सदरील २०१८ चे कर्ज आम्ही सर्वांनी निल केले. त्यानंतर पतसंस्थेने सन २०२० मध्ये पुन्हा कर्ज दिले. त्यावेळेस त्यांनी पुन्हा कागदपत्रे घेतले नाहीत. त्यावेळेस त्यांनी पुन्हा धनादेश घेतले नाही. जुने दिलेले धनादेश त्यांच्याकडेच होते.

पतसंस्थेकडुन मनिषा शिंदे या स्वत: येवुन रकमा घेवुन जात असे. रकमा दिल्यानंतर मनिषा शिंदे ही त्यांच्या रजिस्टरवर आमच्या सहया घेत असे. नविन कर्जाच्या तीन हप्ते मनिषा शिंदेने घेतले आहे. त्यानंतर टाळेबंदी सुरू झाली. त्यानंतर पतसंस्थेकडुन कोणीही आले नाही. मला पतसंस्थेचे कार्यालय कोठे आहे हे मला माहित नाही. आम्ही सदस्य कधीही कार्यालयात गेलो नाहीत. वसुली करिता त्यानंतर पतसंस्थेकडुन कोणीही आले नाही. कर्ज भरण्यासाठी पुन्हा नोटीस आली किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. कर्ज टाळेबंदीमुळे व पतसंस्थेकडुन कोणीही न आल्याने थकीत झाले.

२. आता मला नि.११ दाखविला. सदरील धनादेश जुना कर्जा संदर्भाने २०१८ साली घेतला होता. त्यावेळेस सदरील धनादेशवर फक्त सही होती. त्यामध्ये मजकुर नमुद नव्हता. नविन कर्जफेडीकरता नविन धनादेश दिलेले नाहीत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.एन.जी.डुबे पाटील यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

३. माझे शिक्षण १०वी पर्यंत आहे. मला लिहीता वाचता येते. मला न्यायालयातुन साक्षी समन्स प्राप्त झाले नाही. हे मला माहित आहे की न्यायालयात खोटी साक्ष दिल्यास कारवाई होवु शकते. हे म्हणणे खरे आहे की अरूण शिवाजी पवार यांना पतसंस्थेने २०१९ मध्ये कर्ज दिले होते. आता मला

नि.१९ दाखविला. त्यावर संमतीदार म्हणुन अरूण पवार यांचे पतीचा फोटो आहे. धनादेश आरोपीचाच आहे. परंतु सही कोणाची आहे हे मला माहित नाही. बचत गटाचे दहा सदस्य होते हे दाखवण्यासाठी माझेकडे तोंडी शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा नाही. हे माझे लक्षात नाही की संदेश बचत गट कधी स्थापन झाला. सदरील बचत गटाबाबत माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयात काय साक्ष द्यायची याची कल्पना मला दादु पवार व त्याचे पत्नीने दिली होती. आरोपीचा मला फोन आला होता. हे म्हणणे खरे नाही की त्यांनी काय साक्ष द्यायची त्याने मला सांगितले.

४. कोरे धनादेश घेतले म्हणुन संस्थेविरूध्द सहकार खात्यात किंवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासातील मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला मदत होण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रत्येक महिलेकडुन कोरे धनादेश घेण्यात आले, ज्या महिलेकडे धनादेश नव्हते त्यांचे पती किंवा मुलाकडुन धनादेश घेण्यात आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.११ दाखविला, सदरील धनादेश जुना कर्जा संदर्भाने २०१८ साली घेतला होता, त्यावेळेस सदरील धनादेशवर फक्त सही होती, त्यामध्ये मजकुर नमुद नव्हता, नविन कर्जफेडीकरता नविन धनादेश दिलेले नाहीत हे मी खोटे सांगत आहे. २०१९ साली घेतलेले कर्ज निल झालेले नाही. मी देखील पतसंस्थेकडुन कर्ज घेतलेले आहे. ते देखील थकीत आहे. अरूणा शिवाजी पवार

यांचेदेखील कर्ज थकीत आहे.

प्रश्न – सदरील थकीत कर्जाकरिता वादातील धनादेश देण्यात आला होता ?

उत्तर– धनादेश कोरा होता.

५. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश पुर्ण लिहुन दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

सही/–

(ई.मो.नाईकवाडी)

दिनांक ०६/०३/२०२५ ७वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

अहमदनगर.